पोलीस स्टेशन गडचिरोली
सत्यमेव जयते
जि. गडचिरोली

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली  **P.S.(ठाणे):** गडचिरोली
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0879  **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/11/2024 01:15

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन  **Date From (दिनांक पासून):** 24/10/2024
**Time Period (कालावधी):**  **Date To ( दिनांक पर्यंत):** 12/11/2024
**Time From (वेळेपासून):** 15:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/11/2024  **Time (वेळ):** 21:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/11/2024 01:15 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 4 किमी  **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जिल्हा परिषद कार्यालया , समोरील चाय टपरीवर,गडचिरोली, 442605

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.नागया येलय्या दासरवार

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** येलय्या दासरवार

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कैकाडी वस्ती, ,गोकुळनगर वार्ड क्र 22 गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली, गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |
| 2 | स्थायी पता | कैकाडी वस्ती, ,गोकुळनगर वार्ड क्र 22 गडचिरोली,गडचिरोली,गडचिरोली, गडचिरोली,महाराष्ट्र,442605,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** ठेकेदार

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8275420224

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री विक्की भाष्कर प्रधान | | वडील का नाम : भाष्कर प्रधान | 1. इमारत शाखा, पोलीस अधिक्षक, कार्यालय गडचिरोली ,गडचिरोली ,गडचिरोली,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत-442605 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

फिर्यादीची लेखी तक्रार पोस्टेला प्राप्त होताच

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | सन्डीक्स कंपनीचे 32 जिबी मेमोरी कार्ड 03 नग | 0.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | आयक्यु प्रो 5 जी कंपनीचे ऍन्ड्राईड मोबाईल 1 | 25,000.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | हिरो कंपनीचे साधा मोबाईल 1 | 800.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,800.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
पोलीस स्टेशन गडचिरोली
दिनांक 12/11/2024
नाव:- श्री. नागया येलय्या दासरवार, वय 49 वर्षे, धंदा- ठेकेदारी रा. कैकाडी वस्ती, गोकुळनगर वार्ड क्र 22, ता. जि. गडचिरोली मो.नं. 8275420224

मी दि. 24/10/2024 रोजी ला.प्र.वि. गडचिरोली येथे समक्ष हजर राहून श्री चंद्रशेखर ढोले, पोलीस उपअधिक्षक यांची भेट घेउन माझ्याकडे करण्यात येणा-या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली व त्यावर श्री. ढोले साहेब यांनी माझ्या तक्रारीवर पोलीस निरीक्षक श्री. संतोश पाटील हे पुढील कारवाई करतील असे सांगितले. पोनि पाटील यांना माझ्याकडे होणा-या लाच मागणीबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यानंतर पोनि पाटील यांनी तक्रार लेखी स्वरूपात माझे हस्ताक्षरात देण्यास सांगितले असता मी पोनि पाटील यांना मी तोंडी तक्रार सांगतो आपण लिहुन घ्यावी'' अशी विनंती केल्याने, माझी तक्रार सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करुन त्याची प्रिंट काढून मला मराठीतुन वाचून व समजावुन सांगितली. सदर तक्रार मी सांगीतले प्रमाणे टंकलिखीत केल्याची खात्री केली व त्यावर सही केली. ती तक्रार खालीलप्रमाणे.
मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथे आज दिनांक 24/10/2024 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहत असुन वेगवेगळया प्रकारची ठेकेदारीचे कामे करतो.
माझेकडे MH-33-4492 या क्रमांकाची सेप्टीक टँकर गाडी आहे. मी सन 2023-2024 या कालावधीकरीता गडचिरोली पोलीस विभागातील संपुर्ण जिल्हयाचे पोलीस स्टेशन, उपपोलीस स्टेशन, पोलीस वसाहत, मुख्यालय, एसआरपीएफ व सिआरपीएफ येथील सेप्टीक टँक सफाईचे टेंडर 2100/-रू. टॅन्कर प्रमाणे घेतलेले होते. त्याची मुदत 26/04/2024 रोजी संपत आली होती मात्र लोकसभा निवडणूक 2024 ची आचारसंहीता लागु झाल्याने टेंडर प्रक्रिया राबवणे शक्य नसल्याने मला पुन्हा 03 महिन्यांची मुदत वाढ पाहीजे असल्यास विचारणा करण्यात आल्याने मी त्यास संमती दिल्याने माझे सदरचे टेंडर पुढे सुरु ठेवले होते. त्याप्रमाणे मी सेफ्टीक टँक सफाईची कामे केलेली आहे. त्या केलेल्या कामाचे 7,50,000/-रू. बिल मिळणे बाकी होते ते जमा होण्यापुर्वी श्री. विकी बाबु, ईमारत शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांनी वेळोवेळी मला फोन करुन मी केलेल्या कामाचे बिल मंजूर झाल्यावर सदर बिल त्यांनी बनवून दिल्याबद्दल 1,50,000/- रुपयांची मागणी केली होती. यापुर्वी त्यांनी रनिंग बिल काढण्याकरीता त्यांच्या लग्नाच्या वेळेस 50 हजार रू. व काही दिवसांपुर्वी 4,000/-रू. माझेकडून घेतले होते. यानंतर पुन्हा आज दि. 24/10/2024 रोजी दुपारी 12.15 वा. सुमारास मी गडचिरोली येथील माझे स्वतःचे घरी असतांना माझे मोबाईल क्र. 8275420224 वर मो.क्र.

9403242029 नी फोन करून त्यांनी ''तुझे बिल मीच बनविलो आहे, ते मी मंजूरीकरीता टाकलो असून सदर बिलाची रक्कम तुझ्या खात्यात जमा केले आहे. ते बिल मी बनविल्याबद्दल उरलेले 1,00,000/-रू. आज दुपारपर्यंत मला जिल्हा परिषद गडचिरोली जवळ फोन करून आणून दे, असे म्हणून मला फोनवरून पैशाची मागणी केली आहे.

श्री. विकी बाबु, ईमारत शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली यांनी मला सन 2023-2024 या कालावधीकरीता गडचिरोली पोलीस विभागातील संपुर्ण जिल्हयाचे पोलीस स्टेशन, उपपोलीस स्टेशन, पोलीस वसाहत, मुख्यालय, एसआरपीएफ व सिआरपीएफ येथील सेप्टीक टँक सफाईचे मंजूर टेंडरचे बिल तयार करून दिल्याबद्दल कामाचा मोबदला म्हणून माझेकडे 1,00,000/- रुपये फोनवरून लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री. विकी बाबु, ईमारत शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांना 1,00,000/- रुपये लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली येथे तक्रार देण्यास आलो.

श्री. विकी बाबु, ईमारत शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे.

मी तेलगु भाषीक असून मला मराठी समजते. माझी वरील प्रमाणेची तक्रार मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलिखीत करुन प्रिंट काढून मला मराठीतुन वाचून व समजावुन सांगीतली असता ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर लिहीली असुन खरी आहे.

त्यानंतर पोनि संतोश पाटील यांनी दोन शासकिय पंचांना पाचारण करुन त्यांची व माझी ओळख करून दिली. पोनि पाटील यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी तक्रार पंचांना वाचण्यास दिले. तसेच मी त्यांना माझी सदरची तक्रार समक्ष सांगीतली त्यांची खात्री करुन सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि पाटील यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

यानंतर पोनि पाटील साहेब यांनी त्यांच्या कार्यालयातील हजर स्टाफची मला व पंचांना ओळख करुन दिल्यावर त्यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी त्यांच्या कार्यालयात असलेले सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करते याबाबत पंचांसमोर सविस्तर माहीती देवुन सदरचे व्हाईस रेकॉर्डरचा वापर करुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

त्यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सागुन पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या व दोन्ही पंचांनी माझी पडताळणीपुर्व अंगझडती घेतली. पोनि पाटील साहेब यांचे सुचनेनुसार पोशि संदिप घोरमोडे यांनी सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन वेळ 15.26 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे आतील बनियानला लटकवून ठेवून, मला पंच क्रं. 1 यांचेसह जिल्हा परिषद गडचिरोली जवळ मी आणलेल्या दुचाकी वाहनाने पाठविण्यात आले. मी व पंच क्र. 1 जिल्हा परिषद गडचिरोली जवळ पोहचून माझे मोबाईलने श्री. विकी बाबु, ईमारत शाखा, पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांना फोन करून स्पीकर ऑन करुन जिल्हा परिषदच्या समोर आल्याचे सांगितलो. तेव्हा विकी बाबु हे एका मिनीटांत येत असल्याचे सांगितले. त्यानंतर थोडयाच वेळात विकी बाबु हे त्या ठिकाणी येवुन मला जिल्हा परिषद समोरील चाय दुकानात घेउन गेले. व त्यानी मला ''पाहा न तुम्ही आपण त बिल वाढवुन दिलो, त्यांनी ऑब्जेक्षन घेतले, कल्याण वाल्यांनी नाही का. एस.पी. कड जात होता तो'', ''छान्नव हजार रूपये देवुन दया आपण बिलचे वाढवलो नाही का., त्याचे नाही का?'', ''छान्नव हजार रूपये नाही का. चार हजार रूपये तुम्ही देलेच होते आपल्याले नाही का'', ''पुरे आपले, ते तीन लाख काहितरी आपण ठेवुन दिलोन, आपल्याले लग्नाले दिले ते पन्नास मायनस करून नाही का, एकदा आपण भेटलोन चार हजार मला दिले'',''छान्नव हजार रूपये देवुन दया'' ''छान्नव छान्नव, तीन लाख काहीतरी आपण केलोन होतोन, ट्रिपाचे'', ''ते आज कॅश भरणार आहेत, नाही भरलेत तर रदद करून देतो म्हणलन डायरेक्ट,. किती देता?'', ''86 राहतील, 10 दिल्यानंतर, 86 राहतील नं., 96 मधुन 10 कट करा ठिक आहे न काही हरकत नाही'' अशा प्रकारे बोलणी करून मी केलेल्या कामाचा व बिल बँकेत जमा केल्याचा मोबदला म्हणून लाच मागणीपैकी 50,000/-रू. स्वतःचे लग्नाच्या वेळी तसेच काही दिवसांपुर्वी 4,000/-रू. असे स्विकारल्याचे मान्य करून उर्वरीत 96,000/-रू. लाचेची सुस्पष्ट मागणी केली. त्यावर मी त्यांना सध्या काम असल्याने पैसे नसल्यामुळे 10,000/-रू. देतो, असे सांगितले असता विकी बाबु यांनी पैसे घेवून आल्यावर फोन करून, गेट

समोर येण्यास सांगितले. अशा प्रकारे लाच रक्कमेची मागणी केल्याने व लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने घडलेली हकीकत सांगणे करीता मी आणि पंच क्र. 1 मिळुन ला.प्र.वि. गडचिरोली येथे परत आलो. माझे बनियानच्या आतमध्ये लटकून ठेवलेले व्हॉईस रेकार्डर काढून लाच रक्कम मागणी पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात व्हॉईस रेकॉर्डर वेळ 15.59 वा. बंद केले व नंतर दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली.

यानंतर पोनि पाटील साहेब यांनी पंच क्र. 1 व मला श्री. विकी बाबु यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली. यानंतर पोनि पाटील साहेब यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकूण व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून गै.अ. विकी बाबु यानी मला सेप्टीक टंक सफाईचे मंजूर टेंडरचे बिल तयार करून दिल्याबददल कामाचा मोबदला म्हणून 1,50,000/-रू. लाचेची मागणी करून त्यात यापुर्वी स्वतःच्या लग्नाच्या वेळी 50,000/-रू. तसेच काही दिवसांपुर्वी 4,000/-रू. माझेकडून स्विकारल्याचे स्वखुषीने कबुल करून उर्वरीत 96,000/-रू. लाचेची पंचासमक्ष मागणी करून त्यापैकी 10,000/-रू. पहिला हप्ता व्यवस्था झाल्यावर तसेच 86,000/-रू. बाकी राहतील असे सांगून 10,000/- रू. घेऊन ऑफीसचे गेट जवळ येऊन फोन केल्यानंतर लाच रक्कम स्विकारण्याची संमती दर्शविल्याचे खात्री केली. तेव्हा मी दोन्ही पंचासमक्ष पोनि पाटील यांना पैशाची जुळवाजुळव करणे असल्याचे तसेच विकी बाबु याची कार्यालयाची वेळ संपत असल्याचे सांगितल्याने श्री. विकी बाबु यांचेविरूध्द दि. 25/10/2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर मला विकी बाबु यांना लाच रक्कम देणेकरीता 10,000/-रू. रोख रक्कमेची व्यवस्था करून कारवाई करण्याकरीता 10.00 वा. ला.प्र. वि. कार्यालय गडचिरोली येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या. याबाबत सविस्तर नोंद पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद आहे.

दि. 25/10/2024 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे हजर येवुन पोनि पाटील साहेब यांना भेटून माझे सासरे यांची प्रकृती खुपच खराब असल्याचे सांगुन त्याची प्रकृती बरी झाल्यानंतर प्रत्यक्ष ला.प्र.वि. येवुन सापळा कारवाई करण्याची विनंती केली. त्यानंतर दिनांक 29/10/2024 मी परत ला.प्र.वि. कार्यालय गडचिरोली येथे हजर येवुन पोनि पाटील साहेब यांना भेटून माझे सासरे मरण पावल्याचे सांगीतले व त्यांना सर्व धार्मीक विधी झाल्यानंतर दिनांक 08/11/2024 रोजी कारवाई करीत हजर राहणार असे सांगीतले.

दि. 08/11/2024 रोजी मी ला.प्र.वि. गडचिरोली येथे हजर येवून पोनि पाटील साहेब यांना श्री. विकी बाबु इमारत शाखा गडचिरोली पोलीस अधीक्षक कार्यालय यांचेविरूध्द कारवाई करण्याची विनंती केली. त्यांनुसार पोनि पाटील साहेब यांना सापळयाचे आयोजन करून दोन शासकिय पंचांना पाचारण केले. सापळा कारवाई करीता पैशाची जुळवाजुळव करून स्वतःच्या बचतीतील लाच रक्कम रू. 10,000/- (रू. 500/- दराच्या 20 चलनी नोटा) पोनि पाटील यांचेकडे हजर केले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन पोहवा किशोर जौजांळकर यांनी गुणधर्म सांगीतले. नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. त्यानंतर सदर रक्कम एका लिफाप्यात ठेवले.

त्यानंतर पोनि पाटील यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेवून श्री. विकी बाबु यांनी 10,000/- रूपयाची मागणी केल्याने मला पंचासमक्ष अँथ्रॅसिन पावडर लावलेली 10,000/- लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टचे मागील उजव्या बाजुचे खिश्यात पोहवा किशोर जौजांळकर यांनी अलगत ठेवले. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन विकी बाबु यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून गळयात टाकलेला दुपट्टा काढून डाव्या बाजूच्या खांद्यावर ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

पोनि पाटील यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला गै.अ. विकी बाबु हे नेहमी जिल्हा परिषद गडचिरोली कार्यालया समोरील चाय टपरीवर भेटत असल्याने पंच क्रं. 1 सह मी आणलेल्या दुचाकी वाहनाने जिल्हा परिषद गडचिरोली जवळ येथे पाठविण्यात आले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी जिल्हा परिषद गडचिरोली जवळ पोहचून माझे मोबाईलने गै.अ. विकी बाबु यांना फोन केलो असता त्यांनी फोन उचलले नाही. पुन्हा थोड्या थोड्या वेळाच्या अंतरांनी गै.अ.विकी बाबु यांना दोनदा फोन केले असे एकुण तिनवेळा गै.अ. विकी बाबु यांना फोन करून देखील ते फोन उचलत नव्हते, यामुळे मी व पंच क्र. 1 बराच वेळ त्या ठिकाणी गै.अ. विकी बाबु यांच्या फोनची वाट पाहत थांबून होतो. परंतु गै.अ.विकी बाबु यांचा फोन न आल्याने घडलेली हकीकत सांगण्याकरीता ला.प्र.वि. गडचिरोली येथे परत आलो. कारवाई करून परत

आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर माझी अंगझडती घेतली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोनि पाटील यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.

गै.अ. विकी बाबु यांचे फोनची दिनांक 08/11/2024 ते आज दि. 12/11/2024 रोजी पावेतो वाट पाहत होतो परंतु त्याचा मला फोन न आल्याने पुढील कारवाई करण्याकरीता मी ला. प्र.वि. गडचिरोली येथे हजर आलो व याबाबत मी पाटील साहेब यांना गै.अ.विकी बाबु यांचेविरूध्द पुढील कारवाई करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे पोनि पाटील साहेब यांनी सापळ्याचे आयोजन करून दोन शासकीय पंचाना बोलावून घेतले. पोनि पाटील यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेवून श्री. विकी बाबु यांनी 10,000/- रूपयाची मागणी केल्याने मला पंचासमक्ष अँथ्रॅसिन पावडर लावलेली 10,000/- लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टचे मागील उजव्या बाजुचे खिश्यात पोहवा किशोर जौजांळकर यांनी अलगत ठेवले. त्यानंतर पुन्हा सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन विकी बाबु यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर गळयात टाकलेला दुपट्टा काढून डाव्या बाजूच्या खांद्यावर ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

पोनि पाटील यांचे सुचनेवरून पोशि घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला, गै.अ. विकी बाबु हे नेहमी जिल्हा परिषद गडचिरोली कार्यालया समोरील चाय टपरीवर भेटत असल्याने पंच क्रं. 1 सह मी आणलेल्या दुचाकी वाहनाने जिल्हा परिषद गडचिरोली समोरील चाय टपरीवर पाठविण्यात आले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी जिल्हा परिषद गडचिरोली जवळ पोहचून माझे मोबाईलने गै.अ. विकी बाबु यांना फोन केलो असता त्यांनी फोन उचलला नसल्याने मी व पंच क्र. 1 बराच वेळ त्या ठिकाणी गै.अ. विकी बाबु यांच्या फोनची वाट पाहत थांबून होतो. परंतु गै.अ.विकी बाबु यांचा फोन न आल्याने घडलेली ला.प्र.वि. गडचिरोली येथे परत आलो. कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. त्यानंतर माझी अंगझडती घेतली. याबाबतच्या सविस्तर नोंदी पोनि पाटील यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.

गैरअर्जदार विकी बाबु यांचेकडे दि. 08/11/2024 व दिनांक 12/11/2024 रोजी असे दोन वेळा लाच रक्कम देण्याकरीता गेलो असता, श्री. विकी बाबु यांना कोणत्यातरी कारणास्तव संशय आल्याने व ते माझे फोन उचलत नसल्याने, माझे कडुन पैशाची मागणी करणार नाही व यापुढे माझेकडुन पैसे घेणार नाही असे मला वाटत असल्याने मी पोनि पाटील साहेब यांचेकडे निवेदन सादर केले. त्यानुसार पोनि पाटील साहेबांनी गै.अ. विकी बाबु, ईमारत शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली यांना ताब्यात घेतले. त्यानंतर मेमरी कार्ड व मोबाईल जप्त करण्यात आले याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोनि पाटील सोहेबांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.

तरी दिनांक 24/10/2024 रोजी झालेल्या लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान श्री.विक्की भाष्कर प्रधान, वय 30 वर्षे, पद-वरिष्ठ श्रेणी लिपीक, नेमणुक - इमारत शाखा, पोलीस अधिक्षक, कार्यालय गडचिरोली यांनी मला गडचिरोली पोलीस विभागातील संपुर्ण जिल्हयाचे पोलीस स्टेशन, उपपोलीस स्टेशन, पोलीस वसाहत, मुख्यालय, एसआरपीएफ व सिआरपीएफ येथील सेप्टीक टँक सफाईचे मंजूर टेंडरचे बिल तयार करून दिल्याबददल कामाचा मोबदला म्हणून 1,50,000/-रू. लाचेची मागणी करून त्यात यापुर्वी स्वतःच्या लग्नावेळी 50,000/-रू. तसेच काही दिवसांपुर्वी 4,000/-रू. माझेकडुन स्विकारल्याचे स्वखुशीने कबुल करून उर्वरीत 96,000/-रू. लाचेची मागणी रक्कमेपैकी पहिला हप्ता 10,000/-रू. लाच रककमेची पंचासमक्ष मागणी करुन उर्वरीत 86,000 रुपये नंतर व्यवस्था करून आणुन देण्याची लाच रक्कमेची पंचसाक्षीदारा समक्ष सुस्पष्ठ मागणी केल्याने त्यांचे विरूध्द भ्रष्ठाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केली असून मला मराठीतून वाचून व समजावून सांगितली.ती बरोबर असल्याची खात्री करून मी त्यावर सही केली आहे.

समक्ष

(संतोष पाटील)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.विभाग, गडचिरोली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Santosh Budha Patil
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): dgpsbpm8008
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

D. Nar

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

U9 FIR Ym [illegible]

D. Nar

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Revchand Khushal S
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 15101000402RKSM810

ड्युटी ऑफीसर
नांव बंडू मारबोनवार
पद पो. उप. नि.
पोलीस स्टेशन, गडचिरोली

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**